लोकमत

मस्ट READ

# गोळप ग्रामस्थांच्या सोयीसाठी टँकरने पाणी

## फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क




रत्नागिरी तालुक्यातील गोळप गावाला टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या शुभारंभावेळी उपसरपंच, कंपनी व फाउंडेशनचे अधिकारी उपस्थित होते.

**१००**
**कुटुंबांचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे**

**रत्नागिरी :** तालुक्यातील गोळप गावातील ग्रामस्थांना पाणीटंचाईची झळ बसू लागली आहे. टंचाईच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनच्या माध्यमातून टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे गोळप गावातील ग्रामस्थांची तहान भागविण्यास मदत झाली आहे.

मे महिन्यात अनेक भागांमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न उद्‌भवतो. अशावेळी फिनोलेक्स व मुकुल माधव फाउंडेशन यांनी सामाजिक बांधिलकी जपत गोळप येथील टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. गोळप येथील कातळवाडी, परशुराम नगर, डोंगरेवाडी, हनुमानवाडी व रोहिदास वाडी येथे हा पाणीपुरवठा केला जात आहे. याद्वारे सुमारे १०० कुटुंबांचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ बुधवारी श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व मुकुल माधव फाउंडेशनचे प्रतिनिधी, ग्रामस्थ व उपसरपंच संदीप तोडणकर उपस्थित होते. (वा. प्र.)